महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एनएएक्स-०४२३/प्र.क्र.६२/विशा-१ब, दि. ०९/०७/२०२५.

**विषय** :- नक्षलग्रस्त भागातील अतिसंवेदनशील पोलीस ठाणी/ पोलीस उप ठाणी/ सशस्त्र दूरक्षेत्र घोषित करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एनएएक्स-०४२३/प्र.क्र.६२/विशा-१ब, दि. ०९/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०९१२५०१११८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 14-07-2025 21:22:57

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान), नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २१-अ.

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**नक्षलग्रस्त भागातील अतिसंवेदनशील पोलीस ठाणी/ पोलीस उप ठाणी/ सशस्त्र दूरक्षेत्र घोषित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- एनएएक्स-०४२३/प्र.क्र.६२/विशा-१ब,**
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ९ जुलै, २०२५.

**वाचा-** **१)** शासन निर्णय क्र. एनएएक्स-१११०/प्र.क्र.४९९/ विशा-१ब, दि.११.०२.२०११
२) शासन निर्णय क्र. एनएएक्स-०८०९/प्र.क्र.४९८/ विशा-१ब, दि.०२.०९.२००९
३) शासन निर्णय क्र. एनएएक्स-०८०९/प्र.क्र.४९८/ विशा-१ब, दि.०३.११.२००९

**प्रस्तावना-**

गडचिरोली व अहेरी तसेच गोंदिया जिल्ह्यातील पोलीस ठाणी/ उप पोलीस ठाणी /सशस्त्र दुरक्षेत्रे, पदे व कार्यालये उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये अतिसंवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षेतेखालील गठित समिती, नक्षलग्रस्त भागातील अतिसंवेदनशील पोलीस ठाणी/उप पोस्टे/सशस्त्र दुरक्षेत्रे निश्चित केल्यानंतर दर दोन वर्षांनी नक्षलग्रस्त क्षेत्राचा आढावा घेऊन पोलीस ठाणी/उप पोस्टे/सशस्त्र दुरक्षेत्रे यांची संख्या कमी अधिक करण्याबाबत निर्णय घेईल असे सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

या अनुषंगाने अतिसंवेदनशील भागाचा आढावा घेण्याकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे. तसेच, पोलीस अधीक्षक, गोंदिया येथील श्वान पथक, बिडीडीएस अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणारे दिडपट वेतन महालेखाकार व कोषागार यांच्या आक्षेपांमुळे बंद करण्यात आले आहे. सदरहू पथकांमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना कर्तव्यादरम्यान असलेल्या जोखीमीचा विचार करता या पथकांचा शासन निर्णय दि. १८.२.२०११ मध्ये समावेश करण्याबाबत पोलीस अधीक्षक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे गोंदिया जिल्हयातील मोटार परिवहन यांच्या अधिनस्त विभागात कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिडपट वेतनाचा लाभ देण्यात येत नसल्याने, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे दाखल न्यायालयीन प्रकरणामध्ये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.४.५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत आदेश दिले होते.

उक्त बाबींच्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ अन्वये अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीची बैठक दि.१.१२.२०२३ रोजी घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**<u>शासन निर्णय:-</u>**

I. गडचिरोली जिल्ह्यातील कटेझरी, येलचिल, पातागुडम, आलदंडी, सुरजागड, पिपलीबुर्गी तसेच गोंदिया जिल्ह्यातील पिपरीया, मुरकुटडोह (बेस कॅम्प) आणि पिपरखारी ही सशस्त्र दूरक्षेत्रे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी, जिमलगट्टा व उप विभागीय पोलीस अधिकारी, हेडरी ही कार्यालये दि.१८.२.२०११ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या अतिसंवेदनशील क्षेत्रातील कार्यालयाचे विभाजन करुन नविन स्थापन करण्यात आली आहे. सदर कार्यालये ही यापूर्वी ज्या कार्यालयाचे भाग होते, त्यामध्ये दिडपट वेतन व महागाई भत्ता लागु असल्याने नमूद कार्यालयातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार दिडपट वेतन व महागाई भत्ता देण्यात येत आहे. त्यामुळे उक्त नमूद सशस्त्र दूरक्षेत्रे, पदे व कार्यालय यांच्या नावाचा समावेश दि. १८.२.२०११ रोजीच्या शासन निर्णयामधील अतिसंवेदनशील सशस्त्र दूरक्षेत्रे, पदे व कार्यालयांच्या यादीमध्ये करण्यात येत आहे.

II. गोंदिया जिल्ह्यातील बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि श्वान पथकातील पदे/ कार्यालय यांचा दि. १८.२.२०११ च्या शासन निर्णयामधील अतिसंवेदनशील पदे/ कार्यालयाच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यात येत असून सदर पथकातील ज्या अधिकारी/ अंमलदार यांचे दिडपट वेतन व महागाई भत्ता सन २०२१ मध्ये महालेखाकार व कोषागार यांच्या आक्षेपांमुळे ज्या तारखेपासून स्थगित करण्यात आला आहे त्या तारेखेपासून प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

III. गडचिरोली जिल्ह्यातील उप विभागीय पोलीस अधिकारी, गडचिरोली हे पद/कार्यालय अतिसंवेदनशील म्हणून घोषित करण्यात येत आहे.

IV. गडचिरोली जिल्ह्याप्रमाणेच गोंदिया जिल्हयातील पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचे अधिनस्त मोटार परिवहन विभाग, गोंदिया येथील पोलीस अधीक्षक, गोंदिया यांच्या दि.२५.३.२०२५ रोजीच्या अहवालामध्ये नमूद पदे/कार्यालये अतिसंवेदनशील म्हणून घोषित करण्यात येत असुन त्याठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिडपट वेतन व महागाई भत्ता लागू करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१४/२०२५/व्यय-७, दि. ०६.०१.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७०९१२५०१११८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HEMANT ANANT MAHAJAN

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4146B85AAA58555E80C9D75A2ABA23B993E46DF208B0B469F1B74670DC22D7FA, cn=HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2025.07.09 12:50:55 +05'30'

**(हेमंत महाजन)**
**उप सचिव, गृह विभाग.**

**प्रत:-**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर.
३. अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान), नागपूर.
५. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर.
६. पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया.
७. अधिदान व लेखाधिकारी, नागपूर / गडचिरोली / गोंदिया.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागपूर / गडचिरोली / गोंदिया.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / गडचिरोली / गोंदिया.
१०. अवर सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कक्ष अधिकारी अर्थ-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी, व्यय-७/अर्थोपाय/अर्थ-११, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. संग्रहार्थ नस्ती / निवडनस्ती (वि.शा. १ ब)